**तपासण्या :**

- Basic Thyroid Screening Package
- Thyroid Cancer Screening Package
- Pregnancy Thyroid Screening Package
- Children Thyroid Screening Package
- Anti Thyroid - Antibody
- Ultrasonography of Neck
- FNAC Thyroid
- Technetium Scan of Thyroid

## अवर टीम

| | | |
|---|---|---|
| विभाग प्रमुख | : | डॉ. सौ. वैशाली चेतन देशमुख (एण्डोक्रायनोलॉजीस्ट) |
| पॅट्रन | : | डॉ. डी. एस्. केळकर (संचालक व शस्त्रक्रिया विभाग प्रमुख) |
| थायरॉईड तज्ञ | : | डॉ. सौ. वैशाली चेतन देशमुख<br>डॉ. सौ. वर्षा सुजित जगताप |
| पॅथोलॉजीस्ट | : | डॉ. महेश मंडोलकर |
| रेडिओ न्युक्लिअर मेडिसन स्पेशालीस्ट | : | डॉ. सुजित निलेगावकर |
| रेडिओलॉजिस्ट | : | डॉ. सौ. अश्विनी कुलकर्णी |
| थायरॉईड सर्जन | : | डॉ. डी. एस्. केळकर |
| सहायक डॉक्टर आणि प्रशिक्षक | : | डॉ. सौ. सविता विघे |
| कोऑर्डीनेटर आणि प्रशिक्षक | : | सौ. चिन्मयी भिसे |
| परिचारीका आणि प्रक्षिक्षक | : | सौ. आरती मोरे |
| स्वागत कक्ष | : | सौ. सीमा देशमुख<br>सौ. सरिता नायर |

## नाव नोंदणी / अपॉईंटमेंटसाठी संपर्क साधा

**दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर**
**एरण्डवणे, पुणे ४११ ००४**

**''पुणे थायरॉइड सेंटर''**

## एण्डोक्रायनोलॉजी विभाग

•थायरॉइड सेंटर इंचार्ज•
**डॉ. सौ. वैशाली चेतन देशमुख**

• रिसेप्शन•
**सौ. सीमा देशमुख / सौ. सरिता नायर**

दूरध्वनी क्र. ०२० ४०१५१०००/
४९१५३०५२/३०४४
(वेळ : सकाळी ९ ते दुपारी ४)

ईमेल : punethyroidcentre@gmail.com
वेबसाईट : www.dmhospital.org.department.endocrinology.thyroid

GEN007


लता मंगेशकर मेडिकल फाऊंडेशनचे

# दीनानाथ मंगेशकर सुपर स्पेशालीटी रुग्णालय आणि संशोधन केंद्र

एरंडवणा, पुणे – ४११ ००४.
फोन : ०२० ४९१५३०००/३०५२/३०४४

## एण्डोक्रायनोलॉजी विभाग

**''पुणे थायरॉइड सेंटर''**



## थायरॉइडच्या आजारांचे योग्य निदान, उपचार, व्यवस्थापन, सल्ला आणि मार्गदर्शन केंद्र

## थायरॉईड म्हणजे काय?

थायरॉईड ही फुलपाखरासारखी दिसणारी ग्रंथी मानेच्या तळाशी व अन्ननलिकेच्या बाजूने असते, ही गळ्यातील ग्रंथी थायरॉक्सीन नावाचे संप्रेरक तयार करते.

## थायरॉईड ग्रंथीतुन तयार होणारे मुख्य हार्मोन्स :

१. ट्राय आयोडो थायरोनीन (T3)
२. थायरॉक्झीन (T4)
३. कॅल्सिटोनिन रक्तामधले कॅल्शियम हाडांमध्ये पाठविण्याचे कार्य नियंत्रित करते.

## T3 T4 काय काम करते ?

- T3 T4 हे रसायन या ग्रंथीतून तयार होते.
- शरीरातल्या प्रत्येक पेशी व अवयवाची कार्यक्षमता योग्य राखण्यास मदत करते.
- उदा. शरीरात उर्जा साठवणे.
- उब राखणे.
- वजन नियंत्रित ठेवणे.
- मेंदू, हृदय, स्नायू यांना कार्यक्षम राखण्यास मदत करणे.
- गर्भाच्या मेंदूची वाढ व मुलांमध्ये मानसिक व शारीरिक वाढ घडवून आणणे.
- TSH हे T3 व T4 वर नियंत्रण ठेवण्यास मदत करते.

## थायरॉईड विकार :

**Anatomical :**

यात थायरॉईड ग्रंथीचे आकारात दोष असतात उदा.
थायरॉईड ग्रंथी मोठी होणे (GOITRE)

- गाठी येणे
- कॅन्सर
- सूज येणे (Tyroiditis)

**Functional :**

- यात थायरॉईड ग्रंथीतून तयार होणारे थायरॉईड हार्मोन्सचे रक्तात प्रमाण कमी होणे (Hypothyroidism)
- अथवा जास्त होणे (Hyperthyroidism)

आजार होण्याचा धोका ज्यांच्यात जास्त असतो अशा व्यक्तीने लवकरात लवकर रक्त तपासून आजारांचे निदान करून घेणे व उपचार करणे हा सर्वोत्तम उपाय ठरतो. थायरॉईडचे आजार काही विशिष्ट आजारांमध्ये वा व्यक्तींमध्ये जास्त प्रमाणात आढळतात.

**उदा :**

- लहान वयातील मधुमेह
- आमवात वा संधिवात
- श्वेतकुष्ठ किवा कोड
- डाउन्स सिंड्रोम वा वाढीच्या तक्रारी
- वंध्यत्व वा वारंवार गर्भपात होणे
- रक्तातील चरबीचे प्रमाण वाढले असल्यास
- मनोविकार असल्यास
- त्वचा विकार व केस गळणे
- हृदय विकार
- विस्मरण व शाळेत मागे पडणे
- नैराश्य
- स्थूलपणा व वजन कमी न होणे
- मासिक पाळीच्या तक्रारी
- थायरॉईड ग्रंथीवर शस्त्रक्रिया
- गळ्याला किरणोत्सर्ग उपचार किंवा थायरॉईड विकारांसाठी आयोडीन १३१ दिले असल्यास
- जन्मत: थायरॉईड ग्रंथीचे दोष असल्यास
- गलगंड (GOITRE) असलेल्या व्यक्ती
- प्रत्येक स्त्रीने वयाच्या पस्तीशीनंतर थायरॉईड साठी रक्ताची चाचणी दर ५ वर्षानी करावी

## अयोग्य व अनियमित उपचारांचे दुष्परिणाम :

- मासिक पाळीच्या तक्रारी वाढणे
- लठ्ठपणा वाढणे
- वंध्यत्वाला कारणीभुत
- गरोदरपणात – योग्य उपचाराअभावी गतिमंद अथवा मतीमंद मुल जन्माला येते
- गर्भपात होणे
- लहान मुलांमध्ये योग्य उपचारांच्या अभावामुळे शारीरिक व मानसिक वाढ खुंटते
- वयात येणाऱ्या मुलामुलींमध्ये पौगंडावस्थेतिल तक्रारी उद्भवतात
- प्रौढ व्यक्तीमध्ये ह्या आजाराची लक्षणे वाढीस लागतात व त्याची परिणीती बेशुद्धावस्था येण्यापर्यंत होऊ शकते.

## उपचार कोणी घ्यावा :

- लक्षणे असल्यास
- गरोदर असल्यास
- वंध्यत्व असल्यास
- तीव्र आजाराची लक्षणे असल्यास
- मासिक पाळीच्या तक्रारी
- वाढ खुंटणे
- थायरॉईड होर्मोन गर्भाच्या मेंदूच्या वाढीला आवश्यक असते त्यामुळे मातेमध्ये होणाऱ्या हायपोथायरॉईडीझम मुळे वेळीच उपचार न केल्यास शारीरिक मानसिक व बौद्धिक वाढ मंदावते.
- याच कारणास्तव ज्या स्त्रीला थायरॉईडच्या कुठल्याही आजारासाठी उपचार केला असल्यास किंवा चालू असल्यास.
- ज्या स्त्रीच्या नातेवाईकांमध्ये थायरॉईडचा विकार असल्यास.
- ज्या स्त्रीमध्ये गलगंड असेल अश्या स्त्रियांनी गरोदरपणापुर्वी थायरॉईडची रक्त तपासणी करुन घेण्याची गरज असते.

## आमची सेवा :

१) थायरॉइड ग्रंथीचे आजार –
हायपोथायरॉइड, हायपरथायरॉइड आणि गोईटरच्या गाठी / कॅन्सर इत्यादी व्याधींचे योग्य निदान मार्गदर्शन, उपचार, व्यवस्थापन आणि सल्ला.

२) गरोदरपणातील थायरॉइडचे विकार.

३) आजारांवरील माहितीपर कार्यक्रम व सल्ला.

४) थायरॉइड कर्क रोग उपचार आणि जागरूकता.

५) थायरॉइड सपोर्ट ग्रुप – थायरॉईड आजारांनी ग्रस्त रुग्णांचा थायरॉईड सपोर्ट ग्रुप.

६) आजाराबद्दल डॉक्टर व रुग्णांसाठी शैक्षणिक आणि जागरूकता कार्यक्रम.

७) थायरॉईडच्या रुग्णांसाठी, लग्नापूर्वी, गरोदरपणापूर्वी, वाढीच्या दृष्टीने आणि मेनोपोजसंबंधी (Growth, Premarital, Preconceptional, Pregnancy, Menopause) मार्गदर्शन.

८) दर आठवड्याला थायरॉईड कॅम्प.